**मा.श्री. प्रकाश महाजन (भाप्रसे) जिल्हाधिकारी धुळे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २९.११.२०११ रोजी झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समितीच्या सभेचे इतिवृत्त ( स्थळ - जिल्हाधिकारी कार्यालय धुळे )**

---

सभेस उपस्थित असलेल्या सन्माननिय सदस्यांची यादी सोबत जोडली आहे.

प्रथम सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक जिउकें धुळे यांनी मा.अध्यक्ष यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले. मा.अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली पहिलीच झुम सभा होत असल्याने त्यांचे औद्योगिक संघटनांच्या पदाधिका-यांनी पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले. तदनंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरुवात केली. तत्पुर्वी सर्व सदस्यांनी स्वतःचा ओळख परिचय करुन दिला. सभेत खालील प्रमाणे विषय निहाय चर्चा झाली.

| अ. क्र. | विषय | अनुपालन | |
|---|---|---|---|
| १ | मागील सभा दिनांक १३.०६.२०११ रोजी झालेल्या झुम सभेचे इतिवृत्त मंजुर करणे | दि.१३.०६.२०११ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त पत्र क्र. ३०७१ ते ३१०९ दिनांक ०४.०७.२०११ नुसार सर्व सदस्यांना पाठविण्यांत आलेले असुन इतिवृत्तावर कोणाचाही वेगळा अभिप्राय नसल्याने सर्वानुमते मान्यता देण्यांत आली. | |
| २ | मागील सभेच्या इतिवृत्तानुसार प्रलंबित असलेल्या मुद्यांचा आढावा घेणेबाबत | | |
| १ | धुळे मऔविम क्षेत्रातील मुलभुत सुविधा – पाणी, रस्ते, पथदिवे इ. बाबत - सर्व औ.संघटना | नविन उच्चस्तरीय जलकुंभ बांधण्याचे व रस्त्या दुरुस्तीच्या कामाच्या तांत्रिक निविदा मंजुरीसाठी वरिष्ठ कार्यालयास नांदेड येथे पाठविल्या असुन त्यास १५ दिवसांचा अवधी लागेल असे का.अ. मऔविम यांनी सांगितले. या बाबत सविस्तर चर्चा होवुन सदरचा विषय ब-याच काळापासुन प्रलंबीत असल्यामुळे सदरचे काम तात्काळ होण्यासाठी का.अ.मऔविम धुळे यांनी तांत्रिक मुद्यांच्या तपशिलासह अ.शा.पत्राचा मसुदा मा.अध्यक्ष यांचेकडे एक आठवडयात सादर करावा. | का.अ. मऔविम धुळे |
| २ | सध्या मऔविम मध्ये उपलब्ध असलेले भुखंड, .त्यांची मागणी व विहीत मुदतीत बांधकाम पुर्ण न केलेले भुखंड परत घेणे बाबत – श्री नितीन बंग, मु.प्र. खांदेश औ.विकास परिषद | मऔविमने ७ भुखंड ताब्यात घेतले असुन ७ भुखंडाची ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु असुन २५-३० भुखंडाची ताब्यात घेण्याची प्राथमिक प्रक्रिया सुरु आहे. भुखंड मागणीसाठी नविन २७ अर्ज आले आहेत असे प्रा.अ. मऔविम धुळे यांनी सांगितले. याबाबत सविस्तर चर्चा होवुन रिक्त व ताब्यात घेतलेल्या भुखंडाची यादी मऔविमने त्यांचे नोटीस बोर्डवर लावुन यादी औद्योगिक संघटनांना देणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. सन २०१० पासुन भुखंड वाटपाचे अधिकार मुख्यालयास असुन सर्व कामकाज संकेतस्थळामार्फत फस्ट कम फस्ट नुसार ऑनलाईन असल्याचे प्रा.अ. यांनी सभागृहात सांगितले. | प्रा अ मऔविम धुळे |
| ३ | धुळे मऔविम क्षेत्रातील अतिक्रमण धारकांना भुखंड उपलब्ध करुन देणे बाबत - लघु उद्योग भारती | २४ भुखंड अतिक्रमण धारकांना वाटपासाठी उपलब्ध असुन ३६ लोकांची यादी प्राप्त असल्याचे प्रा.अ. मऔविम यांनी सांगितले. औ.संघटनांनी अतिक्रमण धारकांची ५२ लोकांची यादी असल्याचे सांगितले. याबाबत सविस्तर चर्चा होवुन ३६ कि ५२ लोकांची यादी निश्चीत करुन सर्वांना भुखंड उपलब्ध होतील या दृष्टिने १५ दिवसांत सुधारीत प्रस्ताव तयार करुन | प्रा अ मऔविम धुळे |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | धुळे मऔविम वसाहत क्षेत्रात नविन भुखंड उपलब्ध करणे बाबत - सर्व संघटना | मऔविम क्षेत्रा शेजारील १०० हेक्टर क्षेत्रामध्ये शासनाची व खाजगी जमीन किती आहे याची मोजणी करणेसाठी रुपये तातडीची मोजणी फी २.१३ लक्ष भुमीअभिलेख कार्यालयास दिले असल्याचे उपविभागीय अधिकारी धुळे यांनी सांगितले. या बाबत सविस्तर चर्चा होवुन सबंधीतांकडुन तात्काळ जमिनीचे मोजमाप करुन घेवुन विकासाच्या दृष्टिने जमिन मऔविमकडे देण्याची पुढील कार्यवाही करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | उविअ धुळे भाग / प्रा.अ. मऔविम धुळे |
| ५<br><br><br><br>६ | मुंबई-आग्रा महामार्गावरील जकात नाक्यामुळे होत असलेल्या वाहतुकीच्या अडथळया बाबत – डामा धुळे<br>नरडाणा ग्रोथ सेंटर मध्ये नविन पाईपलाईन टाकुन पाणी उपलब्ध करुन देणे व अविकसीत भुखंड ताब्यातत घेणे बाबत - मा. आमदार श्री.जयकुमार रावल | सदर विषय तात्पुरता निकाली निघाल्यामुळे वगळण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.<br><br><br><br>पाईपलाईन टाकणेचे काम ९५ टक्के पुर्ण झालेले असुन सध्या २ बोअर घेतले असुन विज पुरवठयासाठीचा प्रस्ताव महावितरण कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविला असल्याचे का.अ. मऔविमने सांगितले. अ.अ. महावितरण यांनी सदर इस्टीमेटला मंजुरी दिल्याची खात्री करुन दिनांक ३०.११.२०११ रोजी मऔविमला अहवाल देत असल्याचे सांगितले. या बाबत सविस्तर चर्चा होवुन इस्टीमेट मंजुरी मिळाले नंतर मऔविमने दिनांक ०१.१२.२०११ ला वर्तमानपत्रातुन प्रसिध्दी देवुन पुढील कार्यवाही करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | जिउकें धुळे<br><br><br><br>काअ मऔविम धुळे |
| ७ | मऔविम क्षेत्रातील ईएसआय दवाखान्यात सुविधा मिळणे बाबत व ईएसआयचा फायदा घेतलेल्या सभासदांसाठी शासकीय रुग्णालयात विशेष व्यवस्था होणे बाबत- श्री नितीन बंग,मु.प्र.- खांदेश औद्योगिक विकास परिषद | मऔविम क्षेत्रातील ईएसआय दवाखान्यात रुग्नांना स्टाफ अभावी सुविधा मिळत नाही, स्टाफ भरणे बाबत व मेडीकल कॉलेजला ईएसआय कर्मचा-यासाठी सर्व सुविधा उपलब्ध करणेसाठी ईएसआय आयुक्त यांना अ.शा.पत्राव्दारे कळविण्यांत यावे, असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. ईएसआयने यापुर्वी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती जिउकेंकडे पाठवाव्यात. | ईएसआय धुळे |
| ८<br><br><br>९ | मे.किरण लॅब प्लास्ट, ए-३ उद्योगनगर सह संस्था – घटका समोरील अतिक्रमणा बाबत<br>ए-१० भुखंडावरील अतिक्रमण काढुन भुखंड हस्तांतरण करुन मिळणे बाबत - अध्यक्ष उद्योगनगर सह संस्था धुळे | या बाबत सविस्तर चर्चा होवुन एमआयडीसी व राष्ट्रीय महामार्ग यांनी एकत्रीत जावुन सदरचे अतिक्रमण एक आठवडयात काढणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | का अ मऔविम धुळे / काअ नॅशनल हायवे |
| १० | मऔविम क्षेत्रातील विजबिले वेळेवर मिळणे बाबत - सर्व संघटना | सबंधीत एजन्सीला वेळेवर बिले देणे बाबत सुचीत केले असुन पुन्हा खात्री करण्यांत येवुन पुढील महिन्यापासुन वेळेत बिले देण्याची काळजी घेण्यांत येईल असे अ.अ. महावितरण धुळे यांनी सांगितले. याबाबत सविस्तर चर्चा होवुन पुढील महिन्यापासुन विलंब झाल्यास उद्योजकास भरावा लागलेला दंड सबंधीत एजन्सीकडुन | अअ महावितरण |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | मे.ओमशांती ग्रुप साठी एक्सप्रेस फिडर वरुन मिळत असलेला विज पुरवठा पुर्ण दाबाने व नियमत होणे बाबत श्री देवेंद्र राजपुत, शहर अध्यक्ष, श्री राजेश वाणी, अध्यक्ष, श्री भरत अग्रवाल, सचिव लघु उद्योग भारती धुळे | ओमशांती ग्रुपसाठी त्यांनी २५.०० लक्ष रुपये भरुन स्वतंत्र फिडर घेतले आहे. त्यांना २४ तास विज उपलब्ध होत नसल्यामुळे प्रोसेसींग केलेल्या कच्या मालाचे लाखोचे नुकसान होत आहे. या बाबत आयसीपीआय लागल्यानंतर घटकाची अडचण सुटणार असल्याचे अ.अ. महावितरण यांनी सांगितले. या बाबत सविस्तर चर्चा होवुन कार्यकारी संचालक, महापारेशान मुंबई यांना मा.अध्यक्ष यांचे सहीने पाठवावयाच्या अ.शा.पत्राचा मसुदा तांत्रिक तपशिलासह अ.अ. महावितरण यांनी सादर करावा, असे ठरले. | अ.अ. महावितरण धुळे |
| १२ | बंद पडलेल्या कारखान्यास पुर्ववत विज पुरवठा मिळणे बाबत - श्री सुरेश जुगराज मुथा, प्लॉट नं.११/१२/१३ उद्योग नगर सहकारी संस्था लि, धुळे | सदर घटकाने पुर्वीची थकबाकी भरली असल्याचे उद्योगनगर सहकारी संस्थेच्या पदाधिका-यांनी सांगितले. संपुर्ण थकबाकी एक रकमी भरल्याची खात्री करुन घटकाला नविन विजपुरवठा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही तत्काळ करण्यांत येईल असे अ.अ. महावितरण धुळे यांनी सांगितले. | अ.अ. महावितरण धुळे |
| १३ | मऔविम क्षेत्रात गटारींची व सांडपाण्याची व्यवस्था करणे बाबत - श्री देवेंद्र राजपूत, अध्यक्ष, श्री भरत अग्रवाल, सचिव लघु उद्योग भारती | मऔविम क्षेत्रातील सांडपाणी जाण्यासाठी अवधान गावाजवळील नाला पुरेसा नाही. या बाबत सविस्तर चर्चा होवुन मऔविमच्या बाजुने नाला/गटार केल्यास पाण्याचा निचरा होईल. तसेच हायवे वर काही ठिकाणी असलेले छोटे नाले अवधानच्या बाजुने बंद झाल्याचे व मारुती शोरुम गोंडावुन ते उज्वल ऑटो या दरम्यान नॅशनल हायवे शेजारुन गटार केल्यास पाणी निघण्यास वाव असल्याचे औ.संघटनांच्या पदाधिका-यांनी निदर्शनास आणुन दिले. या बाबत सविस्तर चर्चा होवुन का.अ. मऔविम / नॅशनल हायवे व औद्योगिक संघटनांचे पदाधिकारी यांनी एकत्रित दिनांक ०१.१२.२००१ रोजी साईटवर भेट देवुन मऔविम क्षेत्रातील सांडपाणी व पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी. | काअ मऔविम धुळे / नॅशनल हायवे |
| ३ | नविन विषय - | | |
| १ | १. वसाहतील उद्योगांकडुन थकीत सर्व्हीस टॅक्स वसुली बाबत<br>२. भुखंड खरेदीची रक्कम ही सध्या डिमांड ड्राफ्टव्दारे घेतली जाते ती आरटीजीएस व्दारा घेतली जावी.<br>३. नरडाणा व डीएमआयसीसाठी वेगळे उपविभागीय कार्यालय असावे.<br>४. पाणी उपलब्ध व वापर या बाबत खुलासा<br>५. वसाहतीतील भुखंडाच्या माहिती बाबतचा खुलासा<br>६. वसाहतील सांडपाणी निचरा होण्याची सध्याची व्यवस्था तोकडी | सदर विषयी सविस्तर चर्चा होवुन प्रा.अ. मऔविम / का.अ. मऔविम यांनी योग्य ती कार्यवाही करुन अनुपालन पत्राव्दारे श्री नितीन बंग यांना मऔविमने लेखी पत्राव्दारे कळविण्यांत यावे, असे ठरले. सदर विषय वगळण्यांत यावा असे ठरले. | प्रा अ काअ मऔविम धुळे |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | १. वसाहतीसाठी वेगळया लाईनमनची व्यवस्था करावी.<br>२. सध्या विज बिलांमध्ये जनको चार्जेस हया नावाने नविन वसुली सुरु झाली आहे त्या बद्या विस्तृत खुलास मिळावा.<br>३. वसाहतील लघुदाब ग्राहकाची अश्वशक्ती मर्यादा हा १५० अश्वशक्ती पर्यंत वाढवावी.<br>४. वसाहतीतील ट्रान्सफार्मर बदला बाबत च्या मार्गदर्शक तत्वाचा खुलासा- श्री नितीन बंग, मुख्य प्रवर्तक खांदेश औद्योगिक विकास परिषद धुळे | सदर विषय महावितरणशी सबंधीत असुन पत्र क्र. ७३४५ दिनांक ११.१०.२०११ नुसार अ.अ. महावितरण कं. धुळे यांनी खुलासा सादर केला असुन श्री बंग मुख्य प्रवर्तक खांदेश औ.विकास परिषद धुळे यांना माहितीसाठी ईमेलव्दारे पाठविण्यांत आलेली आहे.<br>तसेच मऔविम क्षेत्रासाठी दोन स्वतंत्र लाईनमनची व्यवस्था तात्काळ करण्यात येईल असे अ.अ.महावितरण यांनी सांगितले. | अ अ महावितरण कंपनी धुळे |
| ३ | राष्ट्रीय महामार्गावर वसाहतीत जाण्यासाठी गुरुव्दारा पासुन (उडडाण पुलाखालुन) ते सुरत बायपास (हॉटेल रेसीडेंसी पार्क) पर्यंत सर्व्हीस रोड त्वरित सुरु करावा व तसेच पुढील सर्व्हीस रोड सुरु करावा - श्री नितीन बंग, मुख्य प्रवर्तक खांदेश औद्योगिक विकास परिषद धुळे | या बाबत राष्ट्रीय महामार्गाच्या सर्व्हीस रोडचा वापर काही गॅरेजवाले करीत असुन त्यामुळे सर्व्हीस रोडवरील वाहतुकीस अडथळा येत असल्याचे औ.संघटनांनी सांगितले. या बाबत नॅशनल हायवे यांनी योग्य ती कार्यवाही करुन गुरुव्दारा ते सुरत बायपास पर्यंतचा सर्व्हिसरोड सुरु करावा. आवश्यकता भासल्यास नॅशनल हायवे यांनी औ.संघटना व पोलीस अधिक्षक यांचे समवेत बैठकीचे आयोजन करण्यांत यावे, असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | राष्ट्रीय महामार्ग धुळे |
| ४ | धुळे वसाहतीत जाण्यासाठी राष्ट्रीय महामार्गावरुन २ ठिकाणी रस्तादुभाजक खंडीत केलेले आहेत. वसाहतीचा वाढता विस्तार लक्षात घेता हॉटेल मानस शेजारील रस्त्यासमोर दुभाजक खंडीत करुन वसाहतीत जाण्यासाठी रस्ता करावा.<br>श्री नितीन बंग, मुख्य प्रवर्तक खांदेश औद्योगिक विकास परिषद धुळे | या बाबत सविस्तर चर्चा होवुन राष्ट्रीय महामार्गाच्या रस्त्याचे लेआवुट तयार करतांना मऔविम क्षेत्रात दोन ठिकाणी रस्ता दुभाजक खंडीत केलेले आहेत. दुभाजक खंडीत करण्यास शासनाने निकष ठरवुन दिलेले असल्यामुळे तिसरा दुभाजक करता येत नसल्याचे नॅशनल हायवे प्रतिनिधींनी सांगितले. या बाबत सविस्तर चर्चा होवुन तिसरा दुभाजक नियमात बसत असल्यास तो करणेस औ.संघटनांनी विनंती केली. | राष्ट्रीय महामार्ग धुळे |
| ५ | उद्योगनगर संस्थेत कार्यरत असलेल्या महावितरण कं.च्या कार्यालयाचे जागा भाडे वाढ करणे बाबत - अध्यक्ष उद्योगनगर सहकारी संस्था धुळे | या बाबत निश्चीत खात्री करुन दिनांक ०५.१२.२०११ पर्यंत सविस्तर माहिती उद्योगनगर संस्थेस देणेत येईल, असे अ.अ. महावितरण यांनी सांगितले. सदर विषय वगळण्यांत यावा असे ठरले. | का.अ. महावितरण कं धुळे |
| ६ | मऔविम धुळे क्षेत्रातील ब-याच उद्योजकांना ग्रापं अवधान यांनी बांधकाम व उद्योग सुरु करण्याची परवानगी न घेतल्यामुळे बेकायदेशिर बांधकामावर उद्योग सुरु केल्याबाबत बजावलेल्या बेकायदेशिर नोटीसा बाबत - श्री नितीन बंग, मुख्य प्रवर्तक खांदेश औ.वि.परिषद धुळे | औद्योगिक क्षेत्रासाठी एमआयडीसीला स्पेशल प्लॅनिंग अॅथोरिटी असल्याने उद्योजकास बांधकाम व उत्पादन परवानगीसाठी ग्रापची परवानगी घेण्याची आवश्यक नसल्याचे का.अ. मऔविम यांनी सांगितले. या बाबत उपमुख्य कार्य.अधिकारी (ग्रापं) व गट विकास अधिकारी यांनी सबंधीत ग्रापं ने बजावलेल्या नोटीसांची | उपमुख्य कार्य. अधिकारी (ग्रापं) व गट विकास अधिकारी |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | ऑईलमिल व्यवसायातील काही सभासदांचे विक्रीकर परतावा मिळण्यास विलंब होत असुन ते तात्काळ मिळणेची कार्यवाही करणे बाबत– धुळे ऑईल सिडस क्रशर असोशिएशन धुळे | ऑईल मिल संघटनेने दिलेल्या निवेदनात प्रलंबीत प्रकरणांची निश्चीत नांवे दिलेली नसल्याचे विक्रीकर कार्यालयाचे प्रतिनिधींनी सांगितले. या बाबत सविस्तर चर्चा होवुन धुळे जिल्हयातील ज्या ६ उद्योजकांचे परतावे प्रलंबीत आहेत, त्याचा नापरतावा १५ दिवसांत सबंधीतांना द्यावा व तसेच खोटे दावे असल्यास सबंधीतांवर विक्रीकर कार्यालयाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | विक्रीकर कार्यालय धुळे |
| ८ | मऔविम क्षेत्रातील भुखंड वाटप लिलाव पध्दतीने न होता सरळ पध्दतीने व्हावे. वाटपा करीता खालील बाबींचे पुर्तता व्हावी. अ. प्रकल्प अहवाल व त्याची फिजीबिलीटी यांचा विचार व्हावा. ब. विस्तारीकरणासाठी भुखंड मागणी केलेल्या उद्योजकाकडे अस्तित्वात असलेल्या भुखंडाची सध्यस्थिती तपासण्यात यावी. तसेच भुखंड रिकामा असल्यास किंवा बांधकाम पुर्ण आहे परंतु उद्योग सुरु केला नाही, अथवा दुसराच उद्योग सुरु केला आहे त्याबाबत नियमीत योग्य तो बदल करण्यांत आला आहे काय, ज्यासाठी भुखंड घेतला त्याच उद्योगासाठी वापरण्यांत येतो काय याची तपासणी करण्यांत यावी, बांधकाम पुर्ण असल्यास योग्य तो एफएसआय वापरण्यात आला आहे काय याची खात्री करण्यांत यावी. २. मऔविम क्षेत्रात ट्रक टर्मीनस मंजुर होणे बाबत - श्री देवेंद्रसींग राजपुत, अध्यक्ष लघु उद्योग भारती धुळे | सदर पत्राची प्रत पुढील कार्यवाहीसाठी प्रा.अ. मऔविम धुळे यांचेकडे पाठविण्यांत आलेली आहे. सध्यस्थिती बाबत मऔविमने पत्र क्र ३२२५ दिनांक २१.११.२०११ नुसार श्री देवेंद्रसिंग राजपुत यांना कळविण्यांत आलेले असल्यामुळे विषय वगळण्यांत यावा असे ठरले. | जिउके धुळे |
| ९ | नॉन टिडीएफ स्किम मधील पात्र उद्योजकांचे परतावा प्रलंबीत प्रकरण तात्काळ चालु करण्यात यावेत व तसेच वसाहतीत व्होल्टेज फ्लक्शुएशन ची समस्या आहे, ती नियंत्रीत करण्यात यावी.- श्री देवेंद्रसिंग राजपुत अध्यक्ष लघु उद्योग भारती धुळे | सविस्तर चर्चा होवुन पात्र उद्योजकांचे प्रलंबीत असलेल्या दाव्यांची यादी औद्योगिक संघटनांनी महावितरणकडे द्यावी, म्हणजे महावितरण त्यावर कार्यवाही करुन अहवाल सादर करेल असे अ.अ.महावितरण धुळे यांनी सांगितले. | अ.अ. महावितरण धुळे |
| ४ | आयत्या वेळच्या विषयावर चर्चा करणे | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जिल्हात वनविगाच्या जमिनीवर वृक्ष लागवड करणे बाबत - | शासनाने धुळे जिल्हयासाठी वनविभागाच्या ३०० हेक्टर जमिनीवर ३ लक्ष झाडे लावण्याचे उद्दिष्ट दिलेले असुन त्यासाठी एनजीओ व जिल्हयातील सर्व औ.संघटनांनी पुढाकार घेवुन राष्ट्रीय कार्यास हातभार लावणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सांगितले. यावेळी वन विभागाच्या व कृषि विभागाच्या अधिका-यांनी योजने विषयी सविस्तर माहिती सभागृहात करुन दिली. यासाठी उद्योजक एनजीओने ५ वर्ष मुदतीचे ट्रायपार्टी अॅग्रीमेंट करुन देणे आवश्यक असुन ५ वर्षापर्यंत झाडे लावण्यासाठी कमीत कमी २५ हेक्टर पर्यंत वनजमिन उपलब्ध करुन दिली जाईल असे सबंधीतांनी सांगितले. या बाबत वनविभागाच्या कार्यालयात दिनांक ०५.१२.२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता सभा आयोजीत करण्यांत येईल. सभेस सर्व औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | वन विभाग |
| २ | जिल्हा उद्योग मित्र व जिल्हा सल्लागार सभा स्वतंत्रपणे घेणे बाबत - श्री नितीन बंग मुख्य प्रवर्तक खांदेश औ.विकास परिषद धुळे | जिल्हा उद्योग मित्र व जिल्हा सल्लागार समितीच्या सभा एकत्रिक घेण्याऐवजी यापुढे वेगवेगळया घेण्यात याव्यात व तसेच जिल्हा उद्योग मित्र सभा नियमीत आयोजीत करणे बाबत श्री नितीन बंग यांनी सांगितले असता त्याप्रमाणे कार्यवाही करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | जिउकें धुळे |
| ३ | दोंडाईचा येथील स्ट्रार्च फॅक्टरी तील दुषीत पाण्याबाबत | दोंडाईचा येथील स्ट्रार्च फॅक्टरीमधील दुषीत पाणी नदीत येत असल्यामुळे प्रदुषण वाढले आहे. या बाबत सविस्तर चर्चा होवुन प्रदुषण मंडळाच्या अधिका-यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देवुन पाण्याची तपासणी करुन अहवाल सादर करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | उप प्रा अ एमपीसीबी जळगांव |

शेवटी मा.अध्यक्ष यांचे व सर्व सदस्यांचे आभार मानुन मा.अध्यक्ष यांचे परवानगीने सभा संपल्याचे सदस्य सचिव यांनी जाहीर केले.

सही /-
महाव्यवस्थापक
तथा सदस्य सचिव
जिल्हा उद्योग केंद्र धुळे

सही/-
**मा. अध्यक्ष तथा**
**जिल्हाधिकारी धुळे**